
गोदातीर दि. 8.11.25

# दरोडा टाकण्याच्या तयारीतील चोरट्यांना वजिराबाद आणि रस्ता सुरक्षा पथकाने केली अटक; घातक शस्त्र जप्त



नांदेड (प्रतिनिधी) - रेल्वे स्थानक ते बसस्थानकादरम्यान असलेल्या जुने शहर बसस्थानक परिसरात दरोडा टाकण्यासाठी अंधारात दबा धरून बसलेल्या पाचपैकी चार चोरट्यांना वजिराबाद आणि रस्ता सुरक्षा पथकाने अटक केली. ही कारवाई सात नोव्हेंबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास करण्यात आली.

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत सपोनि प्रशांत लोंढे हे आणि पथक तसेच रस्ता सुरक्षा पथकातील पोलिसांना नांदेड रेल्वेस्टेशन जवळील जुने सिटी बसस्थानक जवळील पडक्या जागेत काही चोरटे दरोडा घालण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. सपोनि लोंढे व अंमलदारांनी जुने सिटी बसस्थानकजवळ गेले असता आरोपी आदित्य शिवाजी जाधव (वय १९ रा. साठे चौक नांदेड), राजेश रमेश सूर्यवंशी (वय २० रा. शिवनगर, नांदेड), सुरज बालसिंग पवळे (वय १९ रा. शिवनगर नांदेड) आणि कृपालसिंग शेरसिंग टाक (वय २३ रा. रमामातानगर नांदेड) यांना ताब्यात घेतले. तर एक जण मात्र फरार झाला. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे मिरची पावडर, एक दोरी, एक लोखंडी खंजर, दोन दुचाकी वाहने आढळून आली. या प्रकरणी वजिराबाद पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीतांवर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, शासकीय कामात अडथळा आणणे, भारतीय हत्यार कायदा व चोरी असे गुन्हे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला दाखल आहेत.

सदर आरोपी हे नांदेड शहरामध्ये दरोडा टाकण्याचे तयारीत असताना वेळीच त्यांना सदरील पथकाने तात्काळ ताब्यात घेवून घडणाऱ्या घटनेला प्रतिबंध केला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले आहे.